| MHNS240009002022 | **दिवाणी दावा क्र. ६६/२०२२ मधील**<br>**नि.क्र. ४२ वरील आदेश**<br>**नानाजी देवमन वाघ व इतर**<br>**वि.**<br>**ग्रामपंचायत ब्राम्हणगाव, ता. बागलाण, जि. नाशिक** |
|---|---|

**०१.** वादींनी सदर अर्ज न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्यासाठी दाखल केला आहे. वादींनी अर्जात असे नमुद केले की त्यांनी सदरचा दावा हा मोजणी होवुन प्रतिवादींनी केलेल्या अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, त्यांच्या गट क्र.१३९ च्या दक्षिण बाजुस असलेले गायरान गट क्र.१४० या क्षेत्रावर त्यांचे नांव म्हणजेच ग्रामपंचायत ब्राम्हणगांव असे लावुन घेतले. तसेच प्रतिवादी यांनी वादी यांच्या गट क्र.१३९ च्या शेतजमीनीमध्ये ०१ हे.९५ आर क्षेत्र अतिक्रमण केले आहे असे मोजणी दि.२२/०२/२०१९ च्या नकाशाप्रमाणे दिसुन येते. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांनी जमीनीची सरकारी मोजणी करुन त्याप्रमाणे हद्दीखुणा निश्चित करुन बांध घालुन देण्याचे ठरले. त्याप्रमाणे वादींनी मो.र.नं.२३४९ अन्वये अर्ज केला व दि.२२/०२/२०१९ व दि.२६/०३/२०१९ रोजी उपअधिक्षक, भुमिअभिलेख, सटाणा यांनी प्रत्यक्ष येवुन जमीनीच्या हद्द दाखवली. त्यावेळी प्रतिवादी तेथे हजर होते. परंतु प्रतिवादी हे ठरल्याप्रमाणे वागत नाही. सबब, वादीने सदर कारणाकरीता न्यायालयीन आयुक्त म्हणुन उप–अधिक्षक भुमी अभिलेख, बागलाण यांची नेमणुक करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन प्रखर हरकत घेतलेली आहे. प्रतिवादी यांनी अर्जातील मजकुर नाकारलेला आहे. वादीने नि.क्र.४० च्या अर्जावर कोर्ट कमिशनर नेमणुकीकरिता अर्ज केला होता. त्यानंतर सदरचा अर्ज हा चालविणे नाही

असे लिहुन दिले. त्याअनुषंगाने पुन्हा नि.क्र.४२ चा अर्ज दिला. त्यामुळे सदरचा अर्ज कायद्याने चालु शकत नाही. वादीने अर्जामध्ये कलम ३ वर ताब्याची मागणी केली आहे. गट क्र.१३९ चे अनुषंगाने मोजणी केली असल्याचे दाव्यात नमुद आहे. त्या अनुषंगाने पुन्हा मोजणी अर्ज कायदेशिर नाही. वादीची मागणी कायदेशिर नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०३.** वादींचा अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या कथनाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये हद्दी खुणा तसेच अतिक्रमणावरुन वाद आहेत. अशा परिस्थितीत वादी यांचे मिळकतीत प्रतिवादी यांनी नक्की अतिक्रमण केले किंवा कसे हि बाब निश्चित होण्यासाठी वाद मिळकतीची व प्रतिवादी यांच्या मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे. त्यानुसार वादी यांनी उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, बागलाण यांच्यामार्फत मोजणीची मागणी केलेली आहे. प्रकरण गुणदोषावर न्यायनिर्णयीत होणेकामी सदर अर्ज मंजुर करणे न्यायोचित राहिल असे मला वाटते. करीता मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**०१.** वादीचा अर्ज नि.क्र.४२ मंजुर करण्यांत येतो.

**०२.** उप–अधिक्षक भुमी अभिलेख, बागलाण यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

**०३.** न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे ब्राम्हणगाव, ता. बागलाण, जि. नाशिक येथील संपुर्ण गट क्र.१३९ व १४० ची मोजणी करुन हद्द निश्चित करावी. वादी यांच्या मिळकतीत अतिक्रमण केले आहे किंवा कसे, अतिक्रमण केले असेल तर एकुण किती क्षेत्र याबाबत सविस्तर अहवाल नकाशासह दाखल करावा.

**०४.** वादी यांनी मोजणीकामी लागणारी फि रक्कम संबंधीत कार्यालयात आदेश जमा करावी व पैसे भरल्याबाबत पावतीची छायांकित प्रत न्यायालयात सादर करावी.

**०५**. वादी यांनी मोजणीकामी लागणारी सर्व कागदपत्रे भुमी–अभिलेख कार्यालयात सादर करावित.

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.01.20 11:32:23 +0530

**दिनांक – १९/०१/२०२६.** **( सी.यु. शिपकुले )**

**दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सटाणा**